रक्तदान जीवनदान

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव

(अधिष्ठाता यांचे कार्यालय)

Jilhapeth, Government Hospital Campus, Jalgon- 425001, M.S. (INDIA)

Telephone & Fax No. 0257- 2232390 Email- deangmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शावैमज/आस्था (१-२)/कंत्राटी/सहा.प्राध्या./वै.अधि./ता.नि./5124 /२०२२ दिनांक:- 06 /१२/२०२२

**वेबसाईटद्वारे प्रसिध्द (WWW.gmcjalgaon.org)**

## " जाहीरात "

**विषय:- सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिका-यांची रिक्त पदे कंत्राटी (मानधन) करार तत्वावर स्थानिक निवड मंडळ समितीमार्फत भरणे बाबत.**

**संदर्भ:- स्थानिक निवड मंडळ समितीची बैठक दि. ०६/१२/२०२२.**

राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणीक कार्यक्रम व दैनंदिन रुग्णसेवा सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव संस्थेच्या आस्थापनेवरील अचिकित्सालयीन व चिकित्सालयीन विषयांतील रिक्त असलेली सहाय्यक प्राध्यापक (गट-ब) व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव या संस्थेच्या आस्थापनेवरील रिक्त असलेली वैद्यकीय अधिकारी (गट-ब) ची पदे मा.शासन/संचालनालय, मुंबई यांच्यामार्फत बंधपत्रित उमेदवार अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत नियमित उमेदवार अथवा बदलीने उमेदवार उपलब्ध होईपर्यंत किंवा तदर्थ पदोन्नतीने कार्यरत सहयोगी प्राध्यापक मुळ पदावर पदानवत होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळसमितीच्या शिफारशीनुसार १२० दिवसांच्या कालावधीकरीता कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असलेल्या वेतनश्रेणीत गुणवत्तेनुसार भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) उमेदवारांनी अर्ज सादर करावयाचा कालावधी दि. १२/१२/२०२२ ते दि. १६/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत. (सुटीचे दिवस वगळून)

२) मुलाखतीचा दिनांक :- सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी दि.२१/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता.

३) मुलाखतीचा दिनांक :- वैद्यकीय अधिकारी या पदासाठी दि.२२/१२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता.

४) मुलाखतीचे ठिकाण :- मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव (परिषद हॉल)

त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयाच्या संकेत स्थळवर (WWW.gmcjalgaon.org) प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीमधील दर्शविण्यात आलेला विहीत नमुन्यातील अर्ज उपलब्ध (Dawnload) करुन घ्यावा. तसेच सदरील अर्ज परिपुर्ण भरुन त्यासोबत आवश्यक ते सर्व शैक्षणीक अर्हतेचे कागदपत्र/प्रमाणपत्राच्या छायांकित साक्षकित प्रती जोडाव्यात. अर्ज कार्यालयात जमा करतांना त्यासोबत अर्ज शुल्क रु.२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) कार्यालयातील रोखापाल शाखेत भरुन सदरील पावतीची मुळ प्रत अर्जासोबत सादर करण्यात यावी. उमेदवारांनी प्रत्यक्ष येवुन कार्यालयास अर्ज सादर करावा. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये ऑनलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर रहावे. मुलाखतीस उपस्थित न राहील्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही.

(पान क्र.०२ वर)

Scanned by CamScanner

संस्थेतील सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील १२० दिवसांकरीता भरावयाच्या पदांची माहिती खालील प्रमाणे आहे :-

१) सहाय्यक प्राध्यापक

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा | वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | शरीररचनाशास्त्र | ०२ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी (एम.डी/एम.एस)<br>२) राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांची मान्यता दिलेल्या शैक्षणिक अर्हता<br>सर्वसाधारण वर्यामर्यादा ४० वर्ष व शासन सेवेतील व मागासवर्गीय उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. | रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) ठोक मानधन प्रती महा |
| २. | जीवरसायनशास्त्र | ०२ | | |
| ३. | सुक्ष्मजीवशास्त्र | ०१ | | |
| ४. | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०१ | | |
| ५. | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०१ | | |
| ६. | नेत्रशल्य चिकित्साशास्त्र | ०१ | | |
| ७. | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ०१ | | |
| ८. | क्ष-किरणशास्त्र | ०१ | | |
| | एकुण | १० | | |

२) वैद्यकीय अधिकारी

| अ.क्र. | विभाग | रिक्त पदे | शैक्षणिक अर्हता | वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिक्षक कार्यालय | ५ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (एम.बी.बी.एस)<br>२) राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद,नवी दिल्ली यांची मान्यता दिलेल्या शैक्षणिक अर्हता<br>३) सर्वसाधारण वर्यामर्यादा ४० वर्ष व मागासवर्गीय उमेदवारांना उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. | रु.७५,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार) ठोक मानधन प्रती महा |
| | एकुण | ५ | | |

उक्त नमूद दर्शविलेल्या रिक्त जागांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. तक्त्यात नमुद केलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे. वरील सर्व पदांसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदासाठी अर्ज मागविण्यात येत असून, वरील तक्त्याप्रमाणे रिक्त पदांच्या उपलब्धते प्रमाणे प्रथम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येतील व तद्नंतर रिक्त पद उपलब्ध झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना गुणवत्तेप्रमाणे नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात १२०/१२० दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सूचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल.

अटी व शर्ती :-

१) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

(पान क्र.०३ वर)

Scanned by CamScanner

२) सहाय्यक प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी :- सदरील उमेदवारांना दि.३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लक्ष मात्र) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्ठांमधून भागविण्यात येईल.

३) वैद्यकीय अधिकारी पदाची वेतनश्रेणी :- सदरील उमेदवारांना दि.३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एम.बी.बी.एस अर्हताधारक यांना रु. ७५,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार मात्र) सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १०-कंत्राटी सेवा या उद्दीष्ठांमधून भागविण्यात येईल.

४) वयोमर्यादा:- उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

५) गुणवत्ता यादी ही पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या एमडी/एमएस/एमसीएच/डीएम/किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. संशोधन लेख (शोध निबंध) राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

६) जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी जास्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

७) उमेदवार या महाविद्यालया व्यतीरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे व त्या ठिकाणी राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणात सहभाग नोंदविला किंवा कसे? असल्यास केव्हा? (तारीख नमूद करावी) व तसेच अर्जासोबत जोडावे.

८) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

९) उमेदवाराची निवड करतांना ज्या उमेदवारांनी बंधपत्रित सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केला नाही, अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

१०) सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ १२० दिवसांसाठी अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात कंत्राटी स्वरुपात राहील. १२० दिवसानंतर रिक्तपद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा १२० दिवसांसाठी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

११) निवड झालेल्या उमेदवारास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव संस्थेतील कोणत्याही सलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व काम करावे लागेल व प्रशासनास आवश्यकता असल्यास यापैकी कोणतेही रुग्णालयात नेमणूकीत बदल होऊ शकेल. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१२) सदर पदावर कार्यरत असतांना आपणास खाजगी व्यवसाय करता येणार नाही.

१३) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१४) (अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. तसेच एम.डी., एम.एस.डी.एम., एमसी.एच.किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एम.सी. किंवा एम.सी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१५) सहाय्यक प्राध्यापक व वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती संबंधात यापुर्वी ज्यांनी अर्ज /निवेदने सादर केली आहेत त्यांना नव्याने विहित नमुनयात अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

(डॉ. गिरीष ठाकूर)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

Scanned by CamScanner

प्रति,

१) उपरोक्त संबंधित सर्व विषयातील प्राध्यापक व विभागप्रमुख, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव.

२) वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव.

३) सूचना फलकः- अधिष्ठाता कार्यालय, विद्यार्थी विभाग, बाह्य रुग्ण विभाग, मुलांचे व मुलींचे वसतीगृह, मध्यवर्ती ग्रंथालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव.

४) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, अंबाजोगाई, लातूर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपूर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपूर, गोंदिया, बारामती, नंदुरबार, सिधुदुर्ग, अलिबाग, सातारा, उस्मानाबाद.

५) रोखपाल, रोखपाल शाखा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रुग्णालय, जळगांव यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी महाविद्यालयाच्या इच्छुक सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी व पाठ्यनिर्देशक उमेदवारांकडुन (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातुन जाहीरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी तसेच वैद्यकीय अधिकारी पदासाठी इच्छुक उमेदवारांची फॉर्म फी रु.२५०/- रुग्णालय, रोखपाल यांनी स्विकारावी.

प्रतः-१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) मा. आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner

अर्ज क्र.---------- पावती क्र. --------------------व दि. /१२/२०२२

| शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव. वैद्यकीय अधिकारी पदासाठी अर्जाचा नमुना | अलि कडिल काळातील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा. |
|---|---|

प्रति,
मा.अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव.

| | |
|---|---|
| अर्जातील पदाचे नाव : - | विभागाचे नाव :- |
| उमेदवाराचे संपूर्ण नाव :- | |
| कायमचा पत्ता:- | |

| | | |
|---|---|---|
| भ्रमणध्वनी क्रमांक :- | पॅन क्रं.:- | आधार कार्ड क्र.:- |

| जन्म दिनांक :- | तारीख | महिना | वर्ष | गुलाखतीच्या दिवशीचे वय :- | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| योग्य ठिकाणी ✓ करावी | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | SBC | OBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| जन्माची (वयाची) पडताळणी करण्यासाठी दहावीच्या प्रमाणपत्राची किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची प्रत जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अर्जासोबत चालू आर्थिक वर्षाचे दि.३१ मार्च पर्यंतचे नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र जोडावे.-- | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| नोकरीत असल्यास तपशिल देवून नियोकत्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम, द्वितीय, तृतीय, वर्ष एमबीबीएस पास व नापास दोन्ही गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर परिक्षेचे गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.बी.बी.एस. प्रयत्नांचे प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत एम.एम.सी.तसेच एम.सी.आय.चे कायम नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| एम.एम.सी. प्रमाणपत्र चालू वर्षात वैध (रिन्युयल) केलेले असावे. | होय | नाही |
| अर्जदार बंधपत्रित आहे काय ?. | होय | नाही |
| असल्यास बंधपत्रित कालावधीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. | होय | नाही |
| बंधपत्रित असल्यास त्यापैकी किती कालावधी सेवा झाली आहे व किती शिल्लक आहे प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |

| शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण केलेली परिक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | लागलेले प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| १. | तृतीय वर्ष एमबीबीएस | | | | |
| २. | एमडी/एमएस | | | | |
| ३. | इतर | | | | |

अटी व शर्ती :-

अर्जातील पदावरील अनुभव व अनुभव प्रमाणपत्र (नियुक्ती आदेश व रुजू अहवाल) नसल्यास अर्ज बाद होईल.

सदरील अर्जातील पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता एन.एम.सी.च्या मानकांनुसार असावी.

सर्व कागदपत्रे फार्म मधील अनुक्रमांनुसार लावणे.

सादर केलेले सर्व कागदपत्रावर स्वत:ची (Selt Attested) प्रती स्वाक्षरी करणे.

कागदपत्रात त्रृटी आढळल्यास अर्ज बाद होईल. ( आवश्यकता नसलेले प्रमाणपत्रे/कागदपत्रे जोडू नये )

अर्ज पूर्ण वाचून पूर्ण भरावा, अपूर्ण अर्ज स्विकारला जाणार नाही.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधील नमुना-अ (नियम ४ पहा)

मी डॉ./श्रीमती .................................. ..................................श्री .................................. ..................................यांचा

मुलगा/मुलगी/पत्नी वय ........... वर्षे, राहणार ............................ ............. यापुढे पुढील प्रमाणे असे जाहीर करते/करतो की,

१. मी .................................. .......................................................................... या पदासाठी अर्ज सादर करीत आहे.

२. आज मला ............. (संख्या) इतके मुले हयात आहेत. त्यापैकी दि. २८ मार्च, २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ........... इतकी आहे.

३. हयात असलेल्या मुलांची संख्या ०२ पेक्षा अधिक असेल तर दि.२८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

अर्जदाची स्वाक्षरी दिनांकासह :-

| | | |
|---|---|---|
| सोबत अर्जाची फी रु.२५०/- पावती क्र. | दिनांक:- / /२०२२ | स्वाक्षरी :-<br>नाव :-.................................<br>प्राध्यापक व.विभागप्रमुख/<br>वैद्यकीय अधिकारी<br>......... ...........<br>(संमती/असंमती) |

टिप:- अर्जदाराने अर्जासोबत छायांकित सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात, अर्जदाराने प्रत्येक पदासाठी/विषयांसाठी स्वतंत्र अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह सादर करावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्ज तपासणी /गुणाक्रम समिती | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
| वरील कागदपत्रे योग्य आहेत/नाहीत. | सदस्य सचिव | | अध्यक्ष | |
| शिफारस मान्य / अमान्य | | | अधिष्ठाता | |

Scanned by CamScanner

अर्ज क्र.---------- पावती क्र. -------------------व दि. /१२/२०२२

| | |
|---|---|
| शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, जळगांव.<br>**सहाय्यक प्राध्यापक पदासाठी अर्जाचा नमुना**<br>प्रति,<br>मा.अधिष्ठाता,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव. | अलिकडिल कालातील पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा |

| | |
|---|---|
| अर्जातील पदाचे नाव : - | विभागाचे नाव :- |
| उमेदवाराचे संपूर्ण नाव :- | |
| कायमचा पत्ता:- | |

| | | |
|---|---|---|
| भ्रमणध्वनी क्रमांक :- | पॅन क्रं.:- | आधार कार्ड क्र.:- |

| जन्म दिनांक :- | तारीख | महिना | वर्ष | मुलाखतीच्या दिवशीचे वय :- | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

| योग्य ठिकाणी ✓ करावी | SC | ST | VJ | NT-1 | NT-2 | NT-3 | SBC | OBC | EWS | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत जात वैधता प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| जन्माची (वयाची) पडताळणी करण्यासाठी दहावीच्या प्रमाणपत्राची किंवा शाळा सोडल्याचा दाखल्याची प्रत जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अर्जासोबत चालू आर्थिक वर्षाचे दि.३१ मार्च पर्यंतचे नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जदार इतरत्र नोकरीत आहे काय ? | होय | नाही |
| नोकरीत असल्यास तपशिल देवून नियोकत्याचे ना-हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | होय | नाही |
| अनुभव असल्यास प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| अर्जासोबत प्रथम, द्वितीय, तृतीय, वर्ष एमबीबीएस पास व नापास दोन्ही गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत पदव्युत्तर परिक्षेचे गुणपत्रिका जोडाव्यात. | होय | नाही |
| अर्जासोबत एम.बी.बी.एस. प्रयत्नांचे प्रमाणपत्र जोडावे | होय | नाही |
| अर्जासोबत एम.एम.सी.तसेच एम.सी.आय.चे कायम नोंदणी प्रमाणपत्र जोडावे. | होय | नाही |
| एम.एम..सी. प्रमाणपत्र चालू वर्षात वैध (रिन्युयल) केलेले असावे. | होय | नाही |
| अर्जदार हा बंधपत्रित आहे काय ?. | होय | नाही |
| असल्यास बंधपत्रित कालावधीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. | होय | नाही |
| बंधपत्रित असल्यास त्यापैकी किती कालावधी सेवा झाली आहे व किती शिल्लक आहे प्रमाणपत्र जोडावे | | |

| शैक्षणिक अर्हता | उत्तीर्ण केलेली परिक्षा | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | लागलेले प्रयत्न |
|---|---|---|---|---|---|
| १. | तृतीय वर्ष एमबीबीएस | | | | |
| २. | एमडी/एमएस | | | | |
| ३. | इतर | | | | |

अटी व शर्ती :-

अर्जातील पदावरील अनुभव व अनुभव प्रमाणपत्र (नियुक्ती आदेश व रुजू अहवाल) नसल्यास अर्ज बाद होईल.

सदरील अर्जातील पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता एन.एम.सी.च्या मानकांनुसार असावी.

सर्व कागदपत्रे फार्म मधील अनुक्रमां नुसार लावणे.

सादर केलेले सर्व कागदपत्रावर स्वत:ची **(Selt Attested)** प्रती स्वाक्षरी करणे.

Scanned by CamScanner

| |
|---|
| कागदपत्रात त्रूटी आढळल्यास अर्ज बाद होईल. (आवश्यक नसलेले प्रमाणपत्र/कागदपत्रे जोडू नयेत) |
| अर्ज पूर्ण वाचून पूर्ण भरावा, अपूर्ण अर्ज स्विकारला जाणार नाही. |
| महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम-२००५ मधील नमुना-अ (नियम ४ पहा) |
| मी डॉ./श्रीमती ................................. ..................................श्री ................................ ...............................यांचा<br>मुलगा/मुलगी/पत्नी वय ........... वर्षे, राहणार ............................. .............. यापुढे पुढील प्रमाणे असे जाहीर करते/करतो की,<br>१. मी ................................. .......................................................................... या पदासाठी अर्ज सादर करीत आहे.<br>२. आज मला ............. (संख्या) इतके मुले हयात आहेत. त्यापैकी दिनांक:-२८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .......... इतकी आहे.<br>३. हयात असलेल्या मुलांची संख्या ०२ पेक्षा अधिक असले तर दि.२८ मार्च, २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे. |
| अर्जदाची स्वाक्षरी दिनांकासह :- |

| | | |
|---|---|---|
| सोबत अर्जाची फी रु.२५०/- पावती क्र. | दिनांक:- / /२०२२ | स्वाक्षरी :-<br>नाव :-................................<br>प्राध्यापक व.विभागप्रमुख,<br>. . . . . . . . . . . . . . . . . . . . .<br>(संमती/असंमती) |

टिप:- अर्जदाराने अर्जासोबत छायांकित सत्यप्रती जोडलेल्या असाव्यात, अर्जदाराने प्रत्येक पदासाठी/विषयांसाठी स्वतंत्र अर्ज सर्व प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतीसह सादर करावा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्ज तपासणी /गुणाक्रम समिती | सदस्य | सदस्य | सदस्य | सदस्य |
| वरील कागदपत्रे योग्य आहेत/नाहीत. | सदस्य सचिव | | अध्यक्ष | |
| शिफारस मान्य/अमान्य | | | अधिष्ठाता | |

Scanned by CamScanner